# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. २७/०५/२०११

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दिनांक २७/०५/२०११ रोजी सभा सुचना क्र. ०५ दि. २३/०५/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात सायं. ४.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉ. मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २. | श्री. दिनेश दगडु नलावडे | सदस्य |
| ३. | श्री. चंद्रकांत भि. मोदी | सदस्य |
| ४. | श्री. चंद्रकांत खंडोजी म्हात्रे | सदस्य |
| ५. | श्रीम. निर्मला बा. सावळे | सदस्या |
| ६. | श्रीम. कॅटलीन परेरा | सदस्या |
| ७. | श्री. राजेश म्हात्रे | सदस्य |
| ८. | श्री. मोहन जाधव | सदस्य |
| ९. | श्री. लक्ष्मण जंगम | सदस्य |
| १०. | श्री. भगवती तु. शर्मा | सदस्य |
| ११. | श्री. शशिकांत भोईर | सदस्य |
| १२. | श्रीम. मुसर्रतबानो शेख | सदस्या |
| १३. | श्री. रामनारायण दुबे | सदस्य |
| १४. | श्री. मोहन गोपाळ म्हात्रे | सदस्य |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | श्रीम. सुधा वासुदेव व्यास | सदस्या |
| २. | श्रीम. स्नेहा शैलेश पांडे | सदस्या |

**मा. सभापती :-**

सचिव साहेब, सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा शुक्रवार दि. २७/०५/२०११ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहादुर शास्त्री सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०५, दि. २३/०५/२०११ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो. माझे ३-४ महत्वाचे विषय आहेत ते २(के) खाली घ्यायचे आहेत. ते मी वाचन करतो. त्याची तुम्ही अनुमती द्या.

**मा. सभापती :-**

ठिक आहे वाचा.

**भगवती शर्मा :-**

२(के) खाली विषय घेतलेले आहेत त्यांचे मी वाचन करतो. १) घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये महानगरपालिका क्षेत्राचे प्रभाग समिती निहाय अंतर्गत येणाऱ्या प्रभागातील संपूर्ण दैनंदिन साफसफाई विषयक कामे करण्यासाठी आलेल्या निविदांना मंजुरी देणे. २) पुर्नविनियोजन पत्रकास व देयक अदा करणेस मान्यता देणे. ३) महानगरपालिकेच्या आस्थापनेवर लिपीक या पदावर सेवाजेष्ठता देणेबाबत. ४) पुर्नविनियोजन करणेबाबत (परिवहन विभाग)

**नगरसचिव :-**

हे चार विषय २(के) खाली घेण्याची मान्यता आहे का?

**मा. सभापती :-**

मान्यता आहे. शेवटी अजेंडावर घेऊ.

**भगवती शर्मा :-**

मा. सभापती साहेब, माझी दुसरी सुचना अशी आहे की, हे चार विषय आहेत पण आणखीन पण विषय आहेत. आपले एक कर्मचारी काल घरी जाताना त्यांचे मयत झालेलं आहे. श्री. संजय तायशेट्टे तर मला असं वाटते की, आजच्या सभेमध्ये त्यांना श्रध्दांजली देऊन ही सभा तहकुब करावी अशी माझी नम्र विनंती आहे.

**राजेश म्हात्रे :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

सर्वांनी २ मिनिटं उभे राहून श्री. संजय तायशेट्टे यांना श्रध्दांजली वाहायची आहे.

**दुःखवठा ठराव २६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे अधिकारी श्री. संजय तायशेट्टे यांचे निधन झालेले आहे. त्यांचा दुःखवठा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. राजेश म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ठराव क्र. २७ :-**

आज दि. २७/०५/२०११ रोजीची मा. स्थायी समिती सभा तहकुब करण्यात यावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. भगवती शर्मा** **अनुमोदक :- श्री. राजेश म्हात्रे**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सभा संपली असे मी जाहीर करतो. पुढची सभा ही ३१ तारखेला ११.०० वा. लावण्यात येत आहे. तसेच नविन चार विषय घेतलेले ते विषय पत्रिकेवर घेऊन रितसर गोषवाऱ्यासहीत द्यावे.

**(सभा तहकुब झाल्याची वेळ सायं. ५.२० वा)**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**